**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

# ३ व ८ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाला पर्यायी सुट्टी जाहीर

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांना दि. ३ व ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी पर्यायी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दि. १० जुलै व ८ ऑगस्ट, २०२१ या कार्यालयीन सुटीच्या दिवशी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील कामकाज पूर्णवेळ सुरु होते, त्या दोन दिवसांची विद्यापीठाने पर्यायी सुट्टी जाहीर केली आहे.

दि. ४ ते ७ नोव्हेंबर दिवाळीनिमित्त विद्यापीठाला सुट्टी असून दि. ३ ते ८ नोव्हेंबर असे एकूण सहा दिवस विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज बंद राहील. तरी सर्व विद्यार्थी, पालक, महाविद्यालयांतील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी विद्यापीठाच्यावतीने कळविले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०१/११/२०२१.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी